# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## अंतर्गत परिपत्रक

**विषय : गट अ व गट ब मधील उपकुलसचिव, सहायक कुलसचिव व कक्षाधिकारी या पदांच्या ऐच्छिक कार्यभार/अतिरिक्त कार्यभारासाठी संमतीपत्र मागविण्याबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आस्थापनेमध्ये आजमितीस अधिकाऱ्यांची काही पदे रिक्त आहेत. विद्यापीठाचे दैनंदिन कामकाज अधिक सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने जे सेवक सहायक कुलसचिव/कक्षाधिकारी वगळता वर्ग-१ व वर्ग-२ शी समकक्ष अशा तांत्रिक स्वरुपाच्या पदांवर कार्यरत आहेत, अशा सेवकांना उपकुलसचिव, सहायक कुलसचिव अथवा कक्षाधिकारी या निव्वळ प्रशासकीय पदांचा कार्यभार/अतिरिक्त कार्यभार स्विकारण्याचा ऐच्छिक पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अशा इच्छुक कर्मचाऱ्यांनी प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे सदर अंतर्गत परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांपर्यंत त्यांचे अर्ज विभागप्रमुखांमार्फत सादर करावेत. अशा प्राप्त अर्जांवर प्रशासकीय आवश्यकतेनुसार निर्णय घेण्यात येईल.

गणेशखिंड, पुणे -४११००७<br>
जा.क्र. : एएन/ 3031<br>
दिनांक : 06 AUG 2026

(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)<br>
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग<br>
२. मा.संचालक, प्रशाला<br>
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

यांना विनंती की, सदर परिपत्रक त्यांच्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणावे.

# कार्यभार/अतिरिक्त कार्यभार स्विकारण्याबाबत ऐच्छिक पर्याय /संमतीपत्र

प्रति,
मा.कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे -४११००७.

विषय : गट अ व गट ब मधील उपकुलसचिव, सहायक कुलसचिव व कक्षाधिकारी या पदांच्या कार्यभारासाठी ऐच्छिक पर्यायाबाबत...

संदर्भ : या कार्यालयाचे अंतर्गत परीपत्रक क्रमांक ---/२०२६, दिनांक --/०८/२०२६.

वरील संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने, मी खाली नमूद केल्याप्रमाणे माझा ऐच्छिक पर्याय सादर करीत असून, विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संमती दिली असल्यास, मी खालीलपैकी एक पदाचा कार्यभार/अतिरिक्त कार्यभार स्विकारण्यास मी स्वेच्छेने संमती देत आहे.

**कार्यरत सेवकाची माहिती :-**

| अ.क्र. | कार्यरत सेवकाची माहिती | | |
|---|---|---|---|
| १. | सेवकाचे नाव | :- | ------------------------------------------------------------------ |
| २. | सेवक क्रमांक | :- | ------------------------------------------------------------------ |
| ३. | कार्यरत विभाग | :- | ------------------------------------------------------------------ |
| ४. | सध्याचे सेवकाचे पद | :- | ------------------------------------------------------------------ |
| ५. | सध्याच्या पदाचा नियुक्ती दिनांक व आजमितीस सदर पदावरील एकूण सेवा कालावधी | :- | ------------------------------------------------------------------ |
| ६. | अतिरिक्त कार्यभार स्विकारण्यासाठी ऐच्छिक संमती पद | :- | १. ----------------------------------------------------------<br>२. ----------------------------------------------------------<br>३. ---------------------------------------------------------- |
| ४. | मोबाईल नंबर | :- | ------------------------------------------------------------------ |
| ५. | सही | :- | |

-----------------------------------------------------------------------------------------------------------

विभागप्रमुखांचा अभिप्राय :-

सदर सेवकाने सादर केलेला अतिरिक्त कार्यभार स्विकारण्यासाठी ऐच्छिक संमतीपत्र तपासून पुढीलप्रमाणे अग्रेषित करण्यात येत आहे.

-------------------- या पदाचा कार्यभार / अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे/नाही

(शेरा (असल्यास) -----------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------------------)

विभागप्रमुख/संचालक/व्यवस्थापक
सही व शिक्का